# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

संक्र.काअ/ग्रातनिमं/कोप/८५/२०१४-१५/२९७ दिनांक : ३१/३/२०१५

## आदेश केस क्र. ८५ /१४-१५

१) श्री. मारुती दिगंबर जाधव, - अर्जदार
मु.पो. कुभारी, ता. जत,
जिल्हा - सांगली

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली.

२) कार्यकारी अभियंता, - पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, **कवठे महांकाळ**

३) उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय, जत.

**कोरमः-** १. श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव
२. श्री. पी. एस. बुरांडे, सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

## न्याय निर्णय

श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

**तक्रारीचे स्वरुप :-**

श्री. मारुती दिगंबर जाधव, मु.पो. कुंभारी, ता. जत, जि. सांगली यांनी वितरण कंपनी विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जत उप विभागीय कार्यालयाविरुध्द मंचाकडे दि. ०२.०२.२०१५ रोजी गाऱ्हाणे दाखल केले. ग्राहकाने शेती पंपाच्या वीज पुरवठ्यासाठी चलन रु. ६१००/- दि. १५.०७.२०१३ रोजी भरले आहे. ग्राहकाने दि. २१.११.२०१४ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाचा दिनांक १७.१.२०१५ रोजी आदेश झाला आहे. त्यामध्ये जेष्ठता क्रमांकानुसार वीज जोडणी देण्यात यावी असे आदेश देण्यात आले आहेत.

**मंचाकडून अपेक्षित मदत -**

मा. मंच यांनी पारीत केलेला आदेश श्री. दिलीप बाबुराव भोसले, जत वि. महावितरण कवठेमहांकाळ केस क्र. १६५/११-१२ दिनांक ३०-०४-२०१२ तसेच मा. विद्युत लोकपालजी आदेश श्री. शशिकांत सदाशिव भोसले रामपूर ता. जत वि. महावितरण कवठेमहांकाळ केस क्र ४४ /२०१४ दिनांक ०८ जुलै २०१४ या आदेशांचा संदर्भ तसेच मा. राज्य आयोग ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम, २००५ मधील कलम ८ - विद्युत मंचाचे निष्कर्ष उपकलम ८.२ मधील तरतुद --- मंच वितरण परवानेधारकाला खालीलपैकी एक किंवा अनेक गोष्टी निश्‍चित कालमर्यादेत करण्याचे आदेश देईल या तरतुदीनुसार विनंती की, एका निश्‍चित कालमर्यादेत अर्जदार यांना वीज पुरवठा देण्याचा आदेश व्हावा.

सदर तक्रारीवर कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. २७.२.२०१५ रोजी दाखल केले. प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. २३.३.२०१५ रोजी घेतली असता, ग्राहक प्रतिनिधी श्री. एच. बी. खापरे, जत हे हजर होते. वितरण कंपनीतर्फे कोणीही हजर नव्हते. ग्राहक प्रतिनिधी यांनी शेतीपंपाच्या कनेक्शनसाठी दि. १५.०७.२०१३ रोजी रक्कम भरलेली असून अद्यापपर्यंत कनेक्शन मिळालेले नाही. ते निश्‍चित कालावधीत मिळणेबाबतचे आदेश मंचाने द्यावेत अशी विनंती केली.

कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांच्या लेखी अहवालानुसार .

१) ग्राहकाने दि. १५.०७.२०१३ रोजी चलन भरलेले आहे. सदर कनेक्शनसाठी ०.४२ कि.मी. लघुदाब वाहिनीची उभारणी करावी लागत असून त्यांचा २०१३-१४ च्या जेष्ठता यादीमध्ये क्र. २३२ असून सद्या २०१२-१३ च्या जेष्ठता यादीनुसार कामे सुरु आहेत.

२) सदर ग्राहकास सांगली कक्षाने दिलेल्या आदेशानुसार जेष्ठता यादीप्रमाणे कनेक्शन देण्यात येईल. कक्षाने पारित केलेला आदेश कायम व्हावा अशी मंचास विनंती केली.

३) सदर ग्राहकाचे कनेक्शन इन्फ्रा-२ योजनेमधील तरतुदीनुसार ' प्रथम येणाऱ्यास प्रथम ' या तत्वाने जेष्ठता यादीनुसार देण्यात येईल.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

प्रश्न : १) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे ठराविक मुदतीत वीज जोडणी देण्याबद्दल वि.प.ला आदेश देणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही

## कारणमिमासा

ग्राहकाने दि. १५.०७.२०१३ रोजी शेतीपंपाच्या कनेक्शनसाठी चलन भरलेले आहे. त्यास ७ पोलची लघुदाब वाहिनी उभारणी करावी लागणार आहे. महावितरणच्या लेखी निवेदनानुसार सदर ग्राहका करिता २०१३-१४ जेष्ठता यादी नुसार क्रमांक २३२ असून सद्या २०१२-१३ च्या जेष्ठता यादीनुसार कामे सुरु आहेत. २०१३-१४ ची कामे चालू झाल्यानंतर जेष्ठता यादीप्रमाणे तक्रारदाराचे कनेक्शन देण्यात येत असल्याचे कळविले आहे. सदर शेतीपंपाचे वीज कनेक्शन वितरण कंपनी ही महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी ) विनियम -२००५ मधील कलम ४.४ अन्वये जेष्ठतायादीप्रमाणे देणार असून त्यानुसार इतर प्रलंबीत शेतीपंप ग्राहकावर कोणताही अन्याय न होता मा. आयोगाच्या निर्देशाचे पालन होणार आहे.

सुनावणी दरम्यान ग्राहक सदस्य यांनी संबंधित अधिकाऱ्यांना संपर्क साधून ग्राहकाचे कनेक्शन केव्हा देता येईल याची विचारणा करणेबाबत सदस्य सचिव यांना सूचित केले होते. त्याप्रमाणे सदस्य सचिव यांनी कवठे महांकाळ विभागाचे कार्यकारी अभियंता, श्री. कांबळे यांच्याशी संपर्क साधून विचारणा केली होती. तेव्हा त्यांनी २०१२-१३ च्या जेष्ठता यादीप्रमाणे कामे हाती घेण्यात आली आहेत व मे. भारत इलेक्ट्रीकल्स कॉट्रॅक्टर्स, कुपवाड यांना पायाभुत आराखडा अंतर्गत कंत्राटी काम देण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत असे कळविले. तक्रारदाराचे कनेक्शन हे २०१३-१४ च्या जेष्ठता यादीमध्ये असल्यामुळे ठराविक मुदतीत कनेक्शन देणे शक्य होणार नाही असे सांगितले.

वितरण कंपनीने घेतलेली भुमीका ही संपुर्णपणे कायद्यास विसंगत आहे व वीज कायदा २००३ मध्ये जेष्ठतायादी ( Cronology List ) ही संकल्पना कोठेही अस्तित्वात नाही. मुळातच मागणी करणाऱ्या ग्राहकांना कृती व मानके पालन करण्यात अडचणी येत असतील तर त्याचे निराकरण वि. प. ने कृती मानके विनियम २०१४ मधील नियम क्र. १५ नुसार आपल्या अडचणी मा. आयोगाकडून निराकरण करुन घेणे गरजेचे आहे. अशी बाजू सुनावणी दरम्यान ग्राहक प्रतिनिधी यांनी मांडली.

दरवर्षी ग्राहकाच्या विद्युत पुरवठ्याची एकूण मागणी, होणारी वीज निर्मिती, पायाभूत कामे करण्यासाठी लागणारी वित्तीय उपलब्धता याचा एकत्रित विचार करणे वितरण परवानेधारकास क्रमप्राप्त आहे. त्यानुसार वितरण कंपनी नवीन कनेक्शन देणेबाबत आराखडा बनवीत असते. वित्तीय उपलब्धता असल्याशिवाय Infrastructure work करु शकणार नाही हे विचारात घेणे आवश्यक आहे. कृतीची मानके जरी निश्चित केली असली तरी वित्तीय उपलब्धतेशिवाय त्याचे पालन करणे वितरण कंपनीस अशक्य आहे. कृतीची मानके याचे पालन न केल्यास वितरण कंपनीस ग्राहकास भरपाई देणे क्रमप्राप्त आहे. महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी ही कंपनी ॲक्टनुसार स्थापन झाली असली तरी महाराष्ट्र शासनाचे त्याच्यावर नियंत्रण आहे. वितरण कंपनीस पायाभूत आराखडा वेळोवेळी तयार करुन वित्तीय उपलब्धता ही कर्ज रुपाने करावी लागते. नवीन वीज पुरवठ्याची मागणी व वित्तीय उपलब्धता याची सांगड घातल्याशिवाय निश्चित कालावधीमध्ये ग्राहकास विद्युत पुरवठा देणे वितरण कंपनीस शक्य होणार नाही.

वरील विवेचनावरुन ग्राहकास वि.प.ने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग पुरवठा संहिता २००५ मधील कलम ४.४ नुसार नवीन वीज जोडणी देणे बाबत आदेश देणे योग्य होईल असे मंचाचे स्पष्ट मत झालेले आहे. त्यामुळे जेष्ठता यादीनुसार तक्रारदाराचे कनेक्शन देणे योग्य होईल.जेणेकरुन इतर ग्राहकावर अन्याय होणार नाही, सुनावणी दरम्यान तक्रारदारानंतर पैसे भरलेल्या ग्राहकाचे कनेक्शन दिल्याचा मुद्दा समोर आला नाही. **म्हणून मुद्दा क्र. १ चे उत्तर 'नाही '** असे देण्यात आले आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) ग्राहकाची ठराविक मुदतीत विद्युत पुरवठा मिळणेबाबतचे वि.प.ला आदेश व्हावेत ही मागणी फेटाळण्यात येत आहे. वि.प.ने ग्राहकास पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या अटी विनियम २००५ मधील नियम ४.४ नुसार जेष्ठता यादीप्रमाणे विद्युत पुरवठा द्यावा.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

(जी.बी. पानकर)
सदस्य सचिव

अध्यक्ष, पद दिनांक १६-१२-२०१४ पासुन रिक्त.

पी. एस. बुरांडे : सदस्य

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.